सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगास निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-रामआ-२०१७/प्र.क्र.६२/का-१०

नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख-१९ मार्च, २०१८.

वाचा :-

१. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७.
२. शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक-रामआ-२०१७/प्र.क्र.६२/का-१०, दि.२३ मे, २०१७ व दि.२२ ऑगस्ट, २०१७.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७ व दि.०८ ऑगस्ट, २०१७.
४. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१७/१८/कोषा.प्रशा.-५, दि.२९ जानेवारी, २०१८.
५. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अ्रथ-३, दि.०१ फेब्रुवारी, २०१८ व दि.०६ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना :-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात २२३५-२१६१ या लेखाशिर्षाखाली ३६ सहायक अनुदाने (वेतन) या बाबीसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद ₹२,२७,५२,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी सत्तावीस लाख बावीस हजार फक्त) च्या ८०% मर्यादेत ₹१,८२,०१,६००/- (अक्षरी रुपये एक कोटी ब्याऐंशी लाख एक हजार सहाशे फक्त) दि.२३ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये व ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद ₹५,६६,५०,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी सहासष्ट लाख पन्नास हजार फक्त) च्या ७०% मर्यादेत ₹३,९६,५५,०००/- (अक्षरी रुपये तीन कोटी शहाण्णव लक्ष पंचावन हजार फक्त) इतका निधी दि.२२ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य महिला आयोगास वितरित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.५ येथील परिपत्रकानुसार सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी २२३५-२१६१ या लेखाशिर्षाखाली ३६ सहायक अनुदाने (वेतन) या बाबीसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद ₹२,२७,५२,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी सत्तावीस लाख बावीस हजार फक्त) पैकी उपलब्ध २०% अवितरित तरतूद ₹४५,५०,४००/- (अक्षरी रुपये पंचेचाळीस लाख पन्नास हजार चारशे फक्त) व २२३५-२१६१ या लेखाशिर्षाखाली ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद ₹५,६६,५०,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी सहासष्ट लाख पन्नास हजार फक्त) पैकी उपलब्ध २०% अवितरित तरतूद ₹१,१३,३०,०००/-

(अक्षरी रुपये एक कोटी तेरा लाख तीस हजार फक्त) महाराष्ट्र राज्य महिला आयोगास वितरीत करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात २२३५-२१६१ या लेखाशिर्षाखाली ३६ सहायक अनुदाने (वेतन) या बाबीसाठी उपलब्ध अवितरित तरतूद **₹४५,५०,४००/- (अक्षरी रुपये पंचेचाळीस लाख पन्नास हजार चारशे फक्त)** व ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीसाठी उपलब्ध अवितरित तरतूद **₹१,१३,३०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी तेरा लाख तीस हजार फक्त**) इतका निधी महाराष्ट्र राज्य महिला आयोगास वितरित करण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र राज्य महिला आयोगास यापूर्वी उक्त लेखाशिर्षाखाली वितरीत केलेल्या संपूर्ण निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे, या अटीच्या अधीन राहून निधी वितरणास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर निधी महाराष्ट्र राज्य महिला आयोगास वितरित करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. आहरण व संवितरण अधिकारी यांनी हा निधी महाराष्ट्र राज्य महिला आयोगास वितरीत करावा. तथापि, सदरचा निधी कोषागारातून एकदम आहरित न करता महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची खर्चाची / निधीची आवश्यकता तपासून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर (आहरण व संवितरण अधिकारी) यांनी खर्चाचे देयक कोषागारात सादर करावे. जेणेकरुन विनाकरण निधी राज्य महिला आयोगाकडे शिल्लक राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्याची दक्षता सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई व आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी घ्यावी.

५. सदर रक्कम मागणी क्र.एक्स-१, अनिवार्य, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण १०३, महिला कल्याण (११) (०१) महाराष्ट्र राज्य महिला आयोगाला अनुदान (२२३५ २१६१) ३६ सहाय्यक अनुदाने (वेतन), व ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीतून खर्च करण्यात यावी.

६. वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद तपासणी सूची व परिच्छेद क्र.७ ते १८ मधील विभागास लागू होणाऱ्या बाबींची पूर्तता होत असल्याने विभागाच्या स्तरावर सदर निधी वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय, वित्त विभाग परिपत्रक दि.१८ एप्रिल, २०१७, दि.३० जून, २०१७, दि.०८ ऑगस्ट, २०१७, दि.२९ जानेवारी, २०१८, दि.०१ फेब्रुवारी, २०१८ व दि.०६ फेब्रुवारी, २०१८ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३२०१७०६५७४७३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2018.03.20 17:08:40 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
३. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
४. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
७. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर
८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदर निधी बी.डी.एस. प्रणालीवर वितरीत करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
११. निवड नस्ती, का-१०.